**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे**
नवीन प्रशासकीय इमारत, कौन्सील हॉलसमोर, पुणे 1
दुरध्वनी क्र .020-26141082

---

ई-निविदा सुचना क्र 1 सन 2024-25

**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे**, नवीन प्रशासकीय इमारत, कौन्सील हॉलसमोर, पुणे 1 खालील कामाकरिता ,नोंदणीकृत अनुभवी ट्रॅव्हल व्यावसायिकाकडून ई-निविदा मागवित आहेत .

| अ. क्र. | ई-निविदा क्रमांक | कामाचे नाव | एक वर्षाचा अंदाजित खर्च रु. Estimate Cost | बयाणा रक्कम रु. | अनामत रक्कम रु. 3% | निविदा कालावधी | ई-निविदा फॉर्म फी रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1 | **नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे** कार्यालयीन कामासाठी भाडेतत्वावर खाजगी वाहन (वाहनचालक, इंधनासह) भाडेतत्वावर पुरविणेसाठी ई-निविदा **1.इनोव्हा हायक्रॉस Z T-permit - 2025 (पांढरा रंग)** | 12,00,000/- | 25,000/- | 36,000/- | 120 | 3000 + GST/- 18% 540/- एकुण 3540/- |
| Online निविदा प्रसिद्धीचा दिनांक व वेळ | | | दि. 12/02 /2025 रोजी सायंकाळी 6.00 वाजता | | | | |
| Online निविदा बंद होण्याचा कालावधी | | | दि. 18/02 /2025 रोजी सायंकाळी 5.00 वा. | | | | |
| निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | | | दि. 18/02/2025 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत. | | | | |
| निविदा उघडण्याचा दिनांक | | | दि. 20/02/2025 वेळ सकाळी 11.00 वा. | | | | |

**टिप -:**

1. ई-निविदाबाबत सविस्तर माहिती, अटी व शर्ती या http://mahatenders.gov.in व www.igrmaharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
2. ई-निविदे संदर्भात अधिक माहिती व सहाय्यासाठी http://mahatenders.gov.in व d07.igro@igrmaharashtra.gov.in 020-26141082 या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.
3. सदर निविदा प्रक्रिया, http://mahatenders.gov.in यांचे मार्फत राबविण्यात, तसेच निविदेमधील अटी व शर्ती नुसार निविदा प्रसिध्दी बाबत तसेच निविदा प्रक्रिये दरम्यान कायदेशीर अथवा नियमानुसार काही बाबी उपस्थित झाल्यास त्याचे उत्तरदायित्वे नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयाचे राहील.

**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे**
नवीन प्रशासकीय इमारत, कौन्सील हॉलसमोर, पुणे 1
दुरध्वनी क्र .020-26141082

**प्रति,**

मा .**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**
नवीन प्रशासकीय इमारत, कौन्सील हॉलसमोर, पुणे 1

**विषय:-** कार्यालयीन कामासाठी खाजगी वाहन भाडे तत्वावर घेणेबाबत ई-निविदा प्रसिध्दी.

**संदर्भ:-** मधील जाहिरात दिनांक - /02 /2025

महोदय,

1) मी/आम्ही वरील विषयांचे संदर्भात जोडलेल्या प्रपत्रामध्ये निविदा भरत आहे/आहोत.
2) मी/आम्ही माहिती पत्रकातील पात्रतेच्या अटी नुसार निविदा भरण्यास पात्र असून माझ्या/आमच्या पात्रतेबाबत पुराव्याची कागद पत्रे सोबत जोडली आहेत.
3) ना परतावा फॉर्म फी रक्कम रु.(3000+ GST 18% 540) = 3540/- व बयाणा रक्कम रु.25,000/- e-payment द्वारे वेबसाईट वरील सूचनेप्रमाणे जमा केली आहे.
4) निविदेच्या सर्व अटी व शर्ती मला/आम्हाला मान्य आहेत व त्यासंबंधीचे हमीपत्र निविदे सोबत अपलोड केले आहे.

निविदाधारकाची स्वाक्षरी............

निविदाधारकाचे फर्मचे नाव...........................

पत्ता..................................................
......................................................

मोबाईल क्रमांक...........................
ई-मेल....................................

## नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे

नवीन प्रशासकीय इमारत, कौन्सील हॉलसमोर, पुणे 1

## निविदा अटी व शर्ती

1) संपूर्ण निविदा प्रक्रिया ही ऑनलाईन (ई-टेंडरिंग) पद्धतीने राहील.
2) ई-निविदा कालावधी दिनांक / /2025 ते / / ची पुढील निविदा मंजूर होईपर्यंत राहील.
3) निविदाकार यांना निविदे संदर्भातील कागदपत्रे, अटी व शर्ती यांची माहिती पाहणे, डाऊनलोड करणे तसेच निविदा अपलोड करणे इ.करिता ई-निविदा दि.12/02/2025 पासून ते दि.18/02/2025 सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत या कार्यालयाच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध राहील.
4) प्राप्त ई- निविदा संभवतः दि.20/02/2025 रोजी सायंकाळी 5.00 वाजता निविदा समितीतील सदस्यासमोर नवीन प्रशासकीय इमारत, कौन्सील हॉलसमोर, पुणे 1 या कार्यालयात उघडण्यात येतील. निविदा ऑनलाईन उघडताना सर्व प्रथम तांत्रिक लिफाफ्यामधील प्रपत्रे उघडण्यात येतील. तांत्रिक लिफाफ्या मधील सर्व कागदपत्रे पूर्ण सादर केल्याची, ती निविदेच्या अटीनुसार पात्र असल्याची खात्री झाल्यावरच व्यापारी लिफाफा ऑनलाईन उघडण्यात येईल. निविदा उघडण्यासंबंधीची माहिती ही ई- मेलव्दारे निविदाकारास कळविण्यात येईल. याबाबत कोणताही स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.
5) निविदाकाराने ई- निविदा फॉर्मचे शुल्क रु.3000/- (अक्षरी रुपये तीन हजार मात्र)+ 18% GST व निविदा भरताना बयाना रक्कम रुपये 25000/-(अक्षरी रुपये पंचवीस हजार मात्र) हे ऑनलाईन पद्धतीने जमा करायचे आहे.
6) वाहनाचे मीटर रिडींग सुस्थितीत असणे आवश्यक आहे. चालू प्रवासात किलोमीटर रिडींग बंद पडल्यास त्याच मार्गावरील मागील वाहतुकीचे किलोमीटर ग्राहय धरले जाईल. परंतु कंत्राटदाराने तातडीने मीटर रिडींग चालू करून घेणे अनिवार्य राहील.
7) निविदा उघडल्यानंतर निविदाधारकांच्या बयाना रक्कम online पद्धतीने mahatender या पोर्टल व्दारे परभारे जमा होतील.
8) निविदा प्रक्रियेत 3 पेक्षा कमी ग्राह्य निविदा प्राप्त झाल्यास अल्प प्रतिसादामुळे निविदेस पुन्हा मुदतवाढ देण्यात येईल (फेरनिविदा सुचनेव्दारे) अथवा संपूर्ण निविदा प्रक्रियाच रद्द करण्यात येईल, याबाबतचे सर्व अधिकार मा. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी राखून ठेवलेले आहेत.
9) मासिक स्वरुपात भाड्याने घेतलेल्या वाहनाची आवश्यकता दररोज 12 तासापर्यंत (स.8.30 ते संध्या.8.30) राहील, आवश्यकतेनुसार त्यामध्ये बदल अनुज्ञेय राहील.
10) वाहन भाडेतत्वावर घेण्याचा कालावधी कार्यादेश मिळाल्यापासून 3 वर्षेपर्यंत राहील. काम समाधानकारक वाटल्यास आणखी 1 वर्ष मुदतवाढ देणेत येईल किंवा पुरवठा सेवा समाधानकारक नसल्यास 1 वर्षापूर्वी देखील करार रद्द करण्यात येईल, याबाबत 15 दिवस अगोदर पुर्वसूचना देणेत येईल.
11) ई-निविदा धारकाची निविदा मंजूर झाल्यास, परंतु अन्य कारणांनी त्यांनी स्वीकृत केलेली निविदा नाकारल्यास त्यांची बयाना रक्कम जप्त करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

12) निविदा धारकांनी माहिती भरताना दुर्लक्ष केल्यास किंवा पूर्ण माहिती न भरल्यास सदरची निविदा ऑनलाईन रद्द होईल याची नोंद घ्यावी.

13) या निविदेत नमूद कामासाठी कोणत्याही प्रकारचे अग्रिम मंजूर केले जाणार नाही.

14) निविदा मंजूर झालेल्या कंत्राटदारास रु.36,000/- (अक्षरी रुपये छत्तीस हजार मात्र ) अनामत रक्कम म्हणून कराराच्या कालावधीत वैध राहणाऱ्या राष्ट्रीयकृत बँकेची हमी किंवा डिमांड ड्राफ्टच्या स्वरुपात नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक कार्यालय,पुणे यांचेकडे देणे आवश्यक राहील. निविदा मंजूर झालेल्या निविदाधारकाने दिलेल्या मुदतीत अनामत रक्कम रु. 36,000 (अक्षरी रुपये छत्तीस हजार मात्र ) न भरल्यास बयाना रक्कम रु. 25,000/-(अक्षरी रुपये पंचवीस हजार मात्र) जप्त करून मंजूर झालेली निविदा नामंजूर समजण्यात येईल. तसेच अनामत रक्कमेवर व्याज अनुज्ञेय असणार नाही.

15) अनामत रक्कम परत करण्याचा विहित कालावधी (करारनाम्याचा कालावधी + 3 महिने) असा राहील.

16) कंत्राटदाराला यापासून होणाऱ्या उत्पन्नावर शासकीय नियमानुसार प्राप्तीकर (इनकम टॅक्स) (TDS) भरावा लागेल तसेच शासनाच्या दिनांक 1 जुलै 2017 पासून लागू करण्यात आलेल्या जीएसटी कर प्रणाली नुसार जीएसटी कर भरावा लागेल व कंत्राटदाराला दिल्या जाणाऱ्या अदायगीतूनच शासकीय नियमानुसार प्राप्तीकर (इनकम टॅक्स) (TDS) व जीएसटी कापून घेतले जाईल.

17) वेळोवेळी शासकीय नियमातील व शासकीय कार्यालयातील काही बदलांमुळे दिल्या जाणाऱ्या सूचना व अटींचे पालन निविदा धारकास करावे लागेल.

18) दरपत्रक हे मासिक भाडेतत्त्वावर घेतलेले वाहनाची सरासरी धाव 2000 किमीसाठी वाहननिहाय दर अक्षरी व अंकी स्वतंत्रपणे नमूद करावा. सदर दर ऑनलाईन दरपत्रकामध्येच नमूद करण्यात यावेत.

19) वाहनाची संख्या आवश्यकतेप्रमाणे कमी अथवा जास्त होऊ शकेल.

20) शासकीय, निमशासकीय,खाजगी कार्यालयास वाहने पुरविणेचा (कार/जीप) अनुभव आवश्यक आहे.

21) वाहन स्वच्छ,पांढरा रंग व उत्कृष्ट देखभाल केलेले असावे. तसेच ते 2025 चे मॉडेल असावे आणि त्यासाठी निविदा धारकाने सर्व प्रकारच्या करासह,(GST) वगळुन दर नमूद करावेत.

22) इंधन, ऑईल,दुरुस्ती (सर्व्हिसिंग), विमा पॉलिसी व सर्व शासकीय कर, वाहनचालकाचे वेतन व वाहनाचा घसारा, इ. सर्व बाबींचा खर्च वाहन मालकाने स्वत: करावयाचा आहे. वाहन चालकाकडे वाहन चालविण्याचा कायमस्वरूपी परवाना आवश्यक आहे. वाहन चालक प्रशिक्षित, अनुभवी, निर्व्यसनी व शासकीय कार्यालये, विभाग यांची माहिती असणारा असावा. तसेच वाहन चालकाचे चारित्र्य प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

23) वाहन चालकासाठी पांढऱ्या रंगाचा गणवेश वाहन मालकाकडून पुरविणेत यावा. वाहन वापराचा कालावधी सकाळी 8.30 ते सायंकाळी 8.30 वाजेपर्यंत राहील. एखाद्या दिवशी या कालावधी पेक्षा अधिक काळ जर वाहनाची आवश्यकता असेल तर त्याची पूर्वसूचना दिली जाईल. त्या सूचनेप्रमाणे वाहन उपलब्ध होणे आवश्यक आहे.

24) वाहनाचा अपघात झाल्यास त्याची सर्व जबाबदारी ठेकेदाराची/वाहन मालकाची राहील. त्याबाबत कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई कार्यालयाकडुन मिळणार नाही.

25) वाहनाचा सर्वसमावेशक विमा (Full Insurance/Comprehensive Insurance) काढलेला असणे आवश्यक असून वाहनाची Insurance Policy Live असणे आवश्यक आहे.

26) सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार निविदाधारक यांचेकडून मागविण्यात आलेल्या दरांपैकी वाजवी दर स्विकारण्याचे अधिकार कार्यालयाकडे राखीव राहतील. मासिक भाडेतत्वावर घेतलेले वाहनाची धाव 2000 कि.मी.साठी दर मागविणेत येत आहेत. एका महिन्याला 2000 कि.मी. रनिंगचे मान्य दरानुसार रक्कम देय होईल. (प्रपत्र-अप्रमाणे) तसेच 2000 कि.मी. पेक्षा वाहन जास्त धावल्यास पुर्व मान्य दराप्रमाणे पुढील वाढीव दराचे कि.मी.नुसार रक्कम देय होईल. (प्रपत्र-ब प्रमाणे)

27) कार्यालयासाठी गाडी वापरत असताना पुणे शहरातील व पुणे शहराबाहेरचे टोलचे चार्जेस निविदा धारकाने भरल्यास निविदा धारकाने खर्चाची पावती सादर केल्यानंतर कार्यालयाकडुन प्रतिपुर्तीची रक्कम अदा केली जाईल.

28) **महत्वाचे :-** ज्या एजन्सीचा सदर सर्व वाहनांपोटी 2000 कि.मी.साठी एकत्रित मासिक दर सर्वात कमी असेल अशी एजन्सी L1 म्हणून निश्चित केली जाईल. L2,L3..... ठरवताना देखील याच पध्दतीचा अवलंब करण्यात येईल. निविदाधारक यांनी सादर केलेला दर सर्व करासह, (GST वगळून) असेल.

29) निविदा मंजूर झाल्यानंतर निविदा धारकास सदरचे काम स्वत:च करावे. सदरचे काम अन्य कोणासही उपकंत्राटाव्दारे (Subletting) अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करता येणार नाही.

30) निविदेच्या मंजूर अटी व शर्तीस अनुसरुन निविदा धारकासोबत करावयाचा करारनामा सोबत समाविष्ट करणेत आलेला आहे.

31) निविदेच्या मंजूर अटी व शर्तीमध्ये कामाच्या संदर्भात कोणत्याही स्वरूपाचा विवाद निर्माण झाल्यास सदरचा तंटा पुणे येथील मा. न्यायालयाच्या कार्यकक्षेत राहील.

32) डिझेल,पेट्रोल,ऑईल इ. दरात वाढ अथवा घट (बदल) झाल्यास मासिक भाडयात कोणताही बदल करणेत येणार नाही.

33) जी वाहने या कार्यालयाकडे पुरवठा करण्यात येणार आहेत, त्या वाहनांची कागदपत्रे उदा.आरसी व टीसी पुस्तक, हवा प्रदूषण प्रमाणपत्र, विमा पॉलिसी, वाहन चालकाचे लायसेन्स,इ.ची साक्षांकित झेरॉक्स प्रत, सक्षम अधिकाऱ्यांच्या प्रवासी वाहतुक परवाना (टुरिस्ट परमिट) आणि शॉपअॅक्ट लायसेन्सची झेरॉक्स प्रत कार्यालयाकडे देणे आवश्यक आहे.

34) कार्यादेश मिळालेनंतर कार्यालयाकडे वाहने भाडयाने देण्यासाठी तसेच भाडयाने लावलेल्या वाहनामध्ये बदल करण्यासाठी किंवा नविन वाहन पुरविण्यासाठी कार्यालयाच्या आस्थापना विभागाची परवानगी घेणे आवश्यक राहील. कार्यालयाच्या आस्थापना विभागाच्या परवानगी शिवाय परस्पर वाहन पुरविल्यास त्याचे देयक अदा करण्यात येणार नाही.

35) वाहनांचे भाडे महिना पूर्ण झाल्यानंतर दिले जाईल. त्यासाठी वाहनाचे रोजचे कि.मी. नोंदविणेसाठी लॉगबुक कार्यालयाकडुन पुरविले जाईल. सदर लॉगबुकमध्ये दैनंदिन फिरतीच्या नोंदी घेऊन त्या वापरकर्त्या प्राधिकाऱ्याकडुन साक्षांकित करुन घेणे बंधनकारक राहील.

36) दरवर्षी वाहनांचे भाडेमध्ये मुळ मंजुर दराच्या 10% वाढ करण्यात येईल.

37) वाहनाचे किलोमीटर मोजणी नोंदणी महानिरीक्षक,पुणे कार्यालयापासून धरण्यात येईल व दिवसाच्या शेवटची मोजणी नोंदणी महानिरीक्षक,पुणे कार्यालयात घेण्यात येईल.

38) निविदा मंजूर झाल्यास कार्यालयाने मागणी केलेल्या वाहनासाठी unconditional bank guarantee दयावी लागेल. त्याव्यतिरीक्त नवीन वाहन पुरवठा केल्यास प्रत्येक वाहनासाठी unconditional bank guarantee दयावी लागेल. अटी व शर्तीचा भंग झाल्यास unconditional bank guarantee जप्त करण्यात येईल. वाहनांचे देखभाल,दुरुस्ती, अपघात किंवा इतर काही नुकसान झाल्यास त्याची सर्व जबाबदारी वाहन मालकाची राहील. आपणास कार्यालयाच्या मागणीनुसार वाहन पुरवावे लागेल. आपणास मागणी करूनही आपण वाहन पुरविण्यास असमर्थ ठरल्यास व ते वाहन दुसरीकडून भाडयाने घ्यावे लागल्यास त्याचा खर्च आपल्या देयकातून वसूल करण्यात येईल.

39) करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग झाल्यास रु. 1000/- प्रतिदिन दंड आकारण्यात येईल. (ज्या वाहनाच्या किंवा वाहन चालकाच्यामुळे संबंधित अटी व शर्तीचा भंग झाला असेल त्याच्या वाहनबिलामधून सदरचा दंड वसूल करणेत येईल.)

40) एखादया दिवशी जर एखादे वाहन/वाहनचालक कोणतीही पुर्वसुचना न देता उपस्थित राहू शकले नाही किंवा येण्यास नकार दिला तर दौरा स्थानिक असेल तेव्हा संबंधित वाहनासाठी त्या दिवसासाठी रु. 1000/- दंड आकारणेत येईल व दौरा जर बाहेरगावी जाणेसाठीचा असेल तर रु. 2000/- दंड संबंधित वाहनांच्या देयकामधून वसूल करणेत येईल.

41) वाहन नादुरुस्त झाल्यास ते त्वरित दुरुस्त करून घेण्यात यावे. तसेच कार्यालयाची गैरसोय होऊ नये म्हणून त्या कालावधीकरिता तात्पुरत्या स्वरुपात पर्यायी वाहन उपलब्ध करून देण्यात यावे. तसेच दिलेले पर्यायी वाहन योग्य नसल्यास ते नाकारण्याचा अधिकार कार्यालयाचा राहील.

42) कमीत कमी दराची निविदा स्विकारणेत येईल. निविदा मंजुरीनंतर नोंदणीकृत करारनामा 15 दिवसात रु. 500/- चे स्टॅम्प पेपरवर करून दयावा लागेल. करारनामा 15 दिवसाचे आत न केल्यास अथवा टाळाटाळ केली तर बयाना रक्कम जप्त करून निविदा रद्द केली जाईल. करारनामा जरी तीन वर्षाचा केला असला तरी, कार्यालयास आवश्यकता वाटल्यास त्याचा कालावधी कमी अथवा जास्त करता येईल. निविदा स्विकृती दिनांक व वेळ वृतपत्रातील जाहिरातीमध्ये प्रसिध्द केला जाईल. सविस्तर माहिती, अटी व शर्ती या http://mahatenders.gov.in व www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर 020-26141082 या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

43) अयशस्वी निविदा धारकांची बयाणा रक्कम कार्यादेश दिल्यानंतर परत करण्यात येईल व यशस्वी निविदा धारकाची अनामत बयाणा रक्कम सुरक्षा ठेव खाती वर्ग करण्यात येईल.

44) निविदा धारकाकडून वाहतूक परवाना (टूरिस्ट परमिट) व पिवळ्या रंगाची नंबर प्लेट असलेले वाहन कार्यालयास पाठविण्यात यावे. नॉन परमिटचे वाहन आल्यास त्याचा वापर नाकारला जाईल व नियमाप्रमाणे दंड लावण्यात येईल. वाहन चालक उपलब्ध नसल्यास/वाहनात पेट्रोल, डिझेल नसल्यास व त्यामुळे वाहन बंद स्थितीत असल्यास, इतर कोणत्याही कारणाने वाहन उपलब्ध नसल्यास रु.1000/- प्रतिदिन प्रमाणे दंड आकारणेत येईल. 8 दिवसापेक्षा जास्त दिवस वाहन उपलब्ध न झाल्यास वरील रु.1000/- प्रतिदिन या दंडा व्यतिरिक्त मागणी केलेली रक्कम ही मासिक देय रक्कमेच्या प्रमाणबध्द (prorate) प्रमाणे देय होईल.

45) कराराप्रमाणे वाहन न पुरविल्यास निविदा व करार रद्द करण्यात येईल व Unconditional Bank Guarantee जप्त करण्यात येईल.

46) पुरविण्यात येणारे वाहन ही निविदाधारक/कंपनीच्या स्वतःच्या मालकीची असणे आवश्यक आहे. निविदाधारकाने कार्यालयाकडे वाहन देताना किंवा वाहन कमी करताना या कार्यालयाच्या आस्थापना

विभागाची परवानगी घ्यावी. वाहन कमी/जास्त करणेचा अधिकार मा.नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी राखून ठेवला आहे.

47) करार झाल्यानंतर योग्य पद्धतीने वाहन पुरविण्याची जबाबदारी निविदा धारकाची आहे. वारंवार वाहन नादुरुस्त होत असेल तर कार्यालयाचा खोळंबा होऊ शकतो. त्यामुळे वाहन सुस्थितीत ठेवण्यासाठी महिन्यातुन फक्त तीन वेळा नादुरुस्त वाहन दुरुस्तीसाठी परवानगी दिली जाईल. तीन वेळेपेक्षा अधिक वेळा सदर वाहन नादुरुस्त झाल्यास ते वाहन रद्द करण्यात येईल व त्या वाहनाऐवजी सुस्थितीतील पर्यायी वाहन पुरविणेची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

48) वाहन चालकाची वर्तणूक ही चांगली, चारित्र्य संपन्न व निर्व्यसनी असली पाहिजे. कोणत्याही वाहन चालकाविरुद्ध कार्यालयातील अधिकारी /कर्मचारी यांची तक्रार आल्यास योग्य त्या चौकशी अंती सदर वाहन चालक दोषी आढल्यास दोन दिवसात त्या वाहन चालकाऐवजी नवीन वाहन चालक पुरविण्याची जबाबदारी निविदा धारकाची राहील.

49) ई-निविदा दोन लिफाफे पद्धतीने सादर करणे आवश्यक आहे.

अ)सर्व प्रथम तांत्रिक लिफाफा (क्र.1) उघडण्यात येईल व निविदेत नमूद केल्यानुसार आवश्यक ती कागदपत्रे / प्रमाणपत्रे सादर केले आहेत किंवा कसे? याबाबतची खात्री करून घेतल्यानंतरच निविदा दराबाबतचा लिफाफा (क्र.2) उघडण्यात येईल .

ब) आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रे, दर सादर केल्याचे आढळून न आल्यास अशी निविदा अपात्र ठरविण्यात येईल.

**1) लिफाफा क्र.1:- तांत्रिक लिफाफा (आवश्यक अटी)**

1) बयाना रक्कम रु. 25,000/-(अक्षरी रुपये पंचवीस हजार मात्र) व निविदा फॉर्म डाऊनलोडिंग फी रु.3,000 /-(अक्षरी रुपये तीन हजार मात्र ) + 18% GST ई- बँकिंग प्रणालीव्दारे भरल्याची स्कॅन केलेली पावती.
2) ट्रॅव्हल कंपनीचे अद्यावत शॉप ॲक्ट खालील लायसेन्स.
3) पॅनकार्डची साक्षांकित प्रत.
4) GST प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत.
5) निविदाकाराचे बँकेचे नाव, खात्याचा क्र. व आयएफसी कोड इ. तपशीलासह पासबुकची किंवा रद्द केलेल्या धनादेशाची साक्षांकित प्रत.
6) किमान **5** वाहने पुरवठा केलेबाबतचे अनुभव प्रमाणपत्र .
7) स्वमालकीच्या किमान 5 वाहनांची यादी व त्यांचे R.C/ TCBook/InsurancePolicy
8) मागील 3 वर्षाचे आयकर प्रमाणपत्र (2021-22, 2022-2023,2023-24 )
9) आपण सेवा पुरवठा करत असलेल्या ग्राहकांची यादी व त्या कार्यालयाचे पत्ते व दुरध्वनी क्रमांक.
10) वरीलप्रमाणे निविदेतील अटी व शर्ती मला/आम्हाला मान्य व बंधनकारक आहेत असे हमीपत्र निविदाधारकाने लिफाफा क्र.1 तांत्रिक लिफाफ्यात जोडावे. नमुना सोबत जोडला आहे.

**2) लिफाफा क्र.2:- दराची निविदा**

1) लिफाफा क्र.1 मध्ये आवश्यक कागदपत्रे व अटी शर्तींची पूर्तता केलेल्या पात्र निविदा धारकाचेच लिफाफा क्र.2 उघडणेत येईल.

2) साक्षांकित प्रपत्र अ व साक्षांकित प्रपत्र ब.

3) निविदा स्विकारणे अथवा नाकारणे याबाबतचे सर्व अधिकार मा.नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, कौन्सिल हॉलसमोर,पुणे 1 यांनी राखून ठेवलेले आहेत.

4) निविदापूर्व बैठकीस किंवा निविदा उघडते वेळी फक्त निविदाधारक किंवा प्राधिकृत प्रतिनिधी यांनाच उपस्थित राहणेची परवानगी दिली जाईल.

निविदाधारकाची सही.......................................

निविदाधारकांचे नाव व पत्ता...............................................

.........................................................................

.....................................................................

दुरध्वनी/मोबाईल क्र................................................

# निविदाकाराचे संमतीपत्र

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे कडील कार्यालयात कार्यालयीन कामासाठी भाडेतत्त्वावर खाजगी वाहने पुरविणेचा दिनांक / / ते / / या कालावधी करिता व त्यापुढे सन 2024-25 करिता नवीन ई- निविदा करार होईपर्यंत भाडेतत्त्वावर खाजगी वाहने पुरविणेच्या कामाकरिता ई- निविदा.

1) निविदेतील संपूर्ण काम हे निविदेच्या अटी व शर्ती नुसार विहित मुदतीत पूर्ण करण्यास माझी तयारी आहे.
2) शासनाच्या कोणत्याही विभागाने, कार्यालयाने अथवा शासनाच्या अंगिकृत महामंडळ, सार्वजनिक उपक्रम व इतर शासकीय संस्था यांच्याद्वारे मला/आम्हाला काळ्या यादीत (Black listed) समाविष्ट केलेले नाही.
3) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य,पुणे 1 यांनी कार्यालयीन कामकाजाकरिता वाहन पुरविण्यासाठी मागविलेल्या ई-निविदेतील सर्व अटी व शर्ती मी वाचून व समजून घेतल्या असून त्या माझ्यावर बंधनकारक आहेत.
4) निविदेत व्यापारी(दराच्या) लिफाफ्यात नमूद केलेला दर हा सर्व करासह आहे. (GST वगळून)
5) सोबत बयाणा रक्कम रु. 25,000/-(अक्षरी रुपये पंचवीस हजार मात्र) व निविदा फॉर्म डाऊनलोडिंग फी रु.3,000/-(अक्षरी रुपये तीन हजार मात्र )+18% GST सह ई-बँकिंगव्दारे भरल्याची पावती स्कॅन करून अपलोड केलेली आहे.
6) माझी निविदा स्विकृत झाल्यास रक्कम रु.36,000/-(अक्षरी रुपये छत्तीस हजार मात्र ) अनामत ठेव म्हणून तात्काळ भरण्यास मी तयार आहे.
7) निविदेतील नमूद काम अटी व शर्तीनुसार न चुकता करण्याची मी हमी देत आहे. कामात काही अडचण , विलंब, नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी माझी राहील. त्याबाबतची वसुली माझे बयाना रक्कम/सुरक्षा अनामत रक्कम मधून तसेच देय रकमेतून करण्यास माझी काहीही हरकत नाही.

निविदाकाराचे नाव व सही, शिक्का

निविदाकाराचा संपूर्ण पत्ता मोबाईल क्रमांकसह

**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे 1**

**निविदाप्रपत्र**

मासिक स्वरुपात भाड्याने घ्यावयाच्या वाहनांसाठी नमूद केलेले दर

'प्रपत्र - अ'

| अ.क्र. | वाहनांचे वर्णन मॉडेलचे नाव (2025 चे मॉडेल) | प्रतिमाह कि.मी. | नमुद करावयाचे दर (रुपये) | इंधनासह नमुद करावयाचे दर | इंधनाव्यतीरिक्त् नमुद करावयाचे दर |
|---|---|---|---|---|---|
| 1. | **इनोव्हा हायक्रॉस Z T-permit - 2025 (पांढरा रंग)** | प्रती माह 2000 कि.मी साठी रुपये (सर्व करासह)(GST वगळून) | | | |

**टीप:-** GST रक्कम कार्यालयाकडुन स्वतंत्रपणे अदा केली जाईल.

निविदाधारकाची सही..................................

निविदाधारकांचे नाव व पत्ता.........................................

..........................................................................

..........................................................................

दुरध्वनी क्र.........................................

(**टीप**:-सदरील दरपत्रक अटी व शर्ती मधील अ.क्र.25 साठी जोडले आहे.)

**कार्यालयाने ठरविलेले 2000 कि.मी .पेक्षा जादा कि.मी.दर(प्रती कि.मी.) पुढीलप्रमाणे –**

**'प्रपत्र - ब'**

| अ.क्र. | मॉडेलचे नाव | प्रती माह कि.मी. | ए.सी.जादा कि.मी.दर(प्रतीकि.मी.) जास्तीत जास्त | नमुद करावयाचे दर (रुपये) |
|---|---|---|---|---|
| 1. | **इनोव्हा हायक्रॉस Z T-permit -2025 (पांढरा रंग)** | 2000 | 17/- | |

**टीप:-** GST रक्कम कार्यालयाकडुन स्वतंत्रपणे अदा केली जाईल.

निविदाधारकाची सही.................................

निविदाधारकांचे नाव व पत्ता.........................................

.........................................................................

.........................................................................

दुरध्वनी क्र..........................................

# करारनामा

________________________: लिहून देणार

________________________:

________________________:

________________________: लिहून घेणार

________________________:

________________________:

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य,पुणे दैनदिन कार्यालयीन वापरासाठी खाजगी वाहने भाड्याने घेण्यासाठी ई-निविदा सूचना क्र.__ दि.  /  /2025 प्रसिद्ध करण्यात आली होती.

**वाहन प्रकार –**

1. **इनोव्हा हायक्रॉस Z T-permit -2025 (पांढरा रंग)**

**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य,पुणे 1**

**निविदा अटी व शर्ती**

1) ई-निविदा कालावधी दिनांक  /  /2025 ते  /  /  ची पुढील निविदा मंजूर होईपर्यंत राहील.
2) वाहनाचे मीटर रिडींग सुस्थितीत असणे आवश्यक आहे. चालु प्रवासात किलोमीटर रिडींग बंद पडल्यास त्याच मार्गावरील मागील वाहतुकीचे किलोमीटर ग्राहय धरले जाईल. परंतु कंत्राटदाराने तातडीने मीटर चालू करून घेणे अनिवार्य राहील.
3) मासिक स्वरुपात भाड्याने घेतलेल्या वाहनाची आवश्यकता दररोज 12 तासापर्यंत आवश्यकतेनुसार (स.8.30 ते संध्या.8.30) राहील.
4) वाहन भाडेतत्वावर घेण्याचा कालावधी कार्यादेश मिळाल्यापासून 3 वर्षेपर्यंत राहील. काम समाधानकारक वाटल्यास आणखी 1 वर्ष मुदतवाढ देणेत येईल किंवा पुरवठा सेवा समाधानकारक नसल्यास 1 वर्षापूर्वी देखील करार रद्द करण्यात येईल, याबाबत 15 दिवस अगोदर पुर्वसूचना देणेत येईल.
5) या निविदेत नमूद कामासाठी कोणत्याही प्रकारचे अग्रिम मंजूर केले जाणार नाही.
6) निविदा मंजूर झालेल्या कंत्राटदारास रु 36,000/- (अक्षरी रुपये छत्तीस हजार मात्र )अनामत रक्कम म्हणून कराराच्या कालावधीत वैध राहणाऱ्या राष्ट्रीयकृत बँकेची हमी किंवा डिमांड ड्राफ्टच्या स्वरुपात नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेकडे देणे आवश्यक राहील. निविदा मंजूर झालेल्या निविदाधारकाने दिलेल्या मुदतीत अनामत रक्कम रु. 36,000/- (अक्षरी रुपये छत्तीस हजार मात्र ) न भरल्यास बयाना रक्कम रु. 25,000/-(अक्षरी रुपये पंचवीस हजार मात्र) जप्त करून मंजूर झालेली निविदा नामंजूर समजण्यात येईल. तसेच अनामत रक्कमेवर व्याज अनुज्ञेय असणार नाही.

7) अनामत रक्कम परत करण्याचा विहित कालावधी (करारनाम्याचा कालावधी + 3 महिने) असा राहील.

8) कंत्राटदाराला यापासून होणाऱ्या उत्पन्नावर शासकीय नियमानुसार प्राप्तीकर (इनकमटॅक्स) (TDS) भरावा लागेल तसेच शासनाच्या दिनांक 1 जुलै 2018 पासून लागू करण्यात आलेल्या जीएसटी कर प्रणाली नुसार जीएसटी कर भरावा लागेल व कंत्राटदाराला दिल्या जाणाऱ्या अदायगीतूनच **वेळोवेळी प्रचलित असलेल्या** शासकीय नियमानुसार **प्राप्तीकर (इनकम टॅक्स) व (TDS)** कापून घेतले जाईल.

9) वेळोवेळी शासकीय नियमातील व शासकीय कार्यालयातील काही बदलांमुळे दिल्या जाणाऱ्या सूचना व अटींचे पालन निविदा धारकास करावे लागेल.

10) वाहनाची संख्या आवश्यकते प्रमाणे कमी अथवा जास्त होऊ शकेल.

11) शासकीय, निमशासकीय,खाजगी कार्यालयास वाहने पुरविणेचा (कार/जीप) अनुभव आवश्यक आहे.

12) वाहनस्वच्छ, पांढरा रंग व उत्कृष्ट देखभाल केलेले असावे. तसेच ते जानेवारी 2025 चे मॉडेल असावे आणि त्यासाठी निविदा धारकाने सर्व प्रकारच्या करासह (GST) वगळून दर नमूद करावेत.

13) इंधन, ऑईल, दुरुस्ती (सर्व्हिसिंग), विमा पॉलिसी व सर्व शासकीय कर, वाहनचालकाचे वेतन व वाहनाचा घसारा, इ. सर्व बाबींचा खर्च वाहन मालकाने स्वतः करावयाचा आहे. वाहन चालकाकडे वाहन चालविण्याचा कायमस्वरूपी परवाना आवश्यक आहे. वाहन चालक प्रशिक्षित, अनुभवी ,निर्व्यसनी व शासकीय कार्यालये, विभाग यांची माहिती असणारा असावा. तसेच वाहन चालकाचे चारित्र्य प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

14) वाहन चालकासाठी पांढरा रंगाचा गणवेश वाहन मालकाकडून पुरविणेत यावा. वाहन वापराचा कालावधी सकाळी 8.30 ते सायंकाळी 8.30 वाजेपर्यंत राहील. एखाद्या दिवशी या कालावधी पेक्षा अधिक काळ जर वाहनाची आवश्यकता असेल तर त्याची पूर्वसूचना दिली जाईल. त्या सूचनेप्रमाणे वाहन उपलब्ध होणे आवश्यक आहे.

15) वाहनाचा अपघात झाल्यास त्याची सर्व जबाबदारी ठेकेदाराची/वाहन मालकाची राहील. त्याबाबत कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई या कार्यालयाकडुन मिळणार नाही.

16) Public liability Insuarance(Third party Insuarance), वाहनाचा comprehensive insuarance इत्यादी असणे अत्यावश्यक आहे. वाहनामध्ये बसणाऱ्यांचा legal liability insuarance तसेच वाहन चालकाचा legal liability insuarance काढलेला असणे आवश्यक असून सदर विमा पुढील निविदा मंजूर होईपर्यंतच्या कालावधी साठी वैध असणे आवश्यक आहे. वाहनचालक स्वतः मालक असेल तर त्यांची personal accident policy (15 लक्ष) वरीलप्रमाणे वैध असणे आवश्यक आहे.

17) सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार निविदाधारक यांचेकडून मागविण्यात आलेल्या दरांपैकी वाजवी दर स्विकारण्याचे अधिकार कार्यालयाकडे राखीव राहतील. मासिक भाडेतत्वावर घेतलेले वाहनाची धाव 2000 कि.मी.साठी दर मागविणेत येत आहेत. एका महिन्याला 2000 कि.मी. रनिंगचे मान्य दरानुसार रक्कम देय होईल. (प्रपत्र-अ प्रमाणे) तसेच 2000 कि.मी. पेक्षा वाहन जास्त धावल्यास पुर्व मान्य दराप्रमाणे पुढील वाढीव दराचे कि.मी.नुसार रक्कम देय होईल.(प्रपत्र-ब प्रमाणे)

18) कार्यालयासाठी गाडी वापरत असताना पुणे शहरातील व पुणे शहराबाहेरचे टोलचे चार्जेस निविदाधारकाने भरल्यास निविदाधारकाने खर्चाची पावती सादर केल्यानंतर प्रतिपूर्तीची रक्कम कार्यालयाकडुन अदा केले जातील.

19) निविदाधारक यांनी सादर केलेला दर सर्व करासह (GST वगळून) असेल.

20) निविदा मंजूर झाल्यानंतर निविदा धारकास सदरचे काम स्वतःच करावे सदरचे काम अन्य कोणासही उपकंत्राटाद्वारे (Subletting) अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करता येणार नाही.

21) निविदेच्या मंजूर अटी व शर्तीमध्ये कामाच्या संदर्भात कोणत्याही स्वरूपाचा विवाद निर्माण झाल्यास सदरचा तंटा पुणे येथील मा. न्यायालयाच्या कार्यकक्षेत राहील.

22) डिझेल,पेट्रोल,ऑईल इ. दरात वाढ अथवा घट (बदल) झाल्यास मासिक भाडयात कोणताही बदल करणेत येणार नाही.

23) जे वाहन या कार्यालयाकडे पुरवठा करण्यात येणार आहेत, त्या वाहनांची कागदपत्रे उदा.आरसी व टीसी पुस्तक, हवा प्रदूषण प्रमाणपत्र, विमा पॉलिसी, वाहन चालकाचे लायसेन्स,इ.ची साक्षांकित झेरॉक्स प्रत, सक्षम अधिकाऱ्यांच्या प्रवासी वाहतुक परवाना (टुरिस्ट परमिट) आणि शॉपअॅक्ट लायसेन्सची झेरॉक्स प्रत या कार्यालयाकडे देणे आवश्यक आहे.

24) कार्यदिश मिळालेनंतर या कार्यालयाकडे वाहन भाडयाने देण्यासाठी तसेच भाडयाने लावलेल्या वाहनामध्ये बदल करण्यासाठी किंवा नविन वाहन पुरविण्यासाठी कार्यालयाच्या आस्थापनाविभागाची परवानगी घेणे आवश्यक राहील. कार्यालयाच्या आस्थापना विभागाच्या परवानगीशिवाय परस्पर वाहन पुरविल्यास त्याचे देयक अदा करण्यात येणार नाही.

25) वाहनांचे भाडे महिना पूर्ण झाल्यानंतर दिले जाईल. त्यासाठी वाहनाचे रोजचे कि.मी. नोंदविणेसाठी लॉगबुक कार्यालयाकडून पुरविले जाईल. सदर लॉगबुकमध्ये दैनंदिन फिरतीच्या नोंदी घेऊन त्या वापरकर्त्याकडुन साक्षांकित करून घेणे बंधनकारक राहील.

26) दरवर्षी वाहनांचे भाडेमध्ये मुळ मंजुर दराच्या 10% वाढ करण्यात येईल.

27) वाहनाचे किलोमीटर मोजणी प्राधिकरण कार्यालयापासून धरण्यात येईल व दिवसाच्या शेवटची मोजणी या कार्यालयात घेण्यात येईल.

28) करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग झाल्यास रु. 1000/- प्रतिदिन दंड आकारण्यात येईल. (ज्या वाहनाच्या किंवा वाहन चालकाच्यामुळे संबंधित अटी व शर्तीचा भंग झाला असेल त्याच्या वाहन बिलामधून सदरचा दंड वसूल करणेत येईल.) **वाहन किंवा वाहनचालकाने वाहतूक व इतर नियमांचे उल्लंघन केल्यास त्याबाबत होणाऱ्या दंडाची रक्कम वाहन ठेकेदार/ वाहनचालक यांना स्वतः भरावी लागेल.**

29) एखादया दिवशी जर एखादे वाहन/वाहनचालक कोणतीही पुर्वसुचना न देता उपस्थित राहू शकले नाही किंवा येण्यास नकार दिला तर दौरा स्थानिक असेल तेव्हा संबंधित वाहनासाठी त्या दिवसासाठी प्रती वाहन रु. 1000/- दंड आकारणेत येईल व दौरा जर बाहेरगावी जाणेसाठीचा असेल तर प्रती वाहन रु. 2000/- दंड संबंधित वाहनांच्या देयकामधून वसूल करणेत येईल.

30) वाहन नादुरुस्त झाल्यास ते त्वरित दुरुस्त करून घेण्यात यावे. तसेच कार्यालयाची गैरसोय होऊ नये म्हणून त्या कालावधीकरिता तात्पुरत्या स्वरुपात पर्यायी वाहन उपलब्ध करून देण्यात यावे. तसेच दिलेले पर्यायी वाहन योग्य नसल्यास ते नाकारण्याचा अधिकार या कार्यालयाचा राहील.

31) अयशस्वी निविदाधारकांची बयाणा रक्कम कार्यदिश दिल्यानंतर परत करण्यात येईल व यशस्वी निविदा धारकाची अनामत बयाणा रक्कम सुरक्षा ठेव खाती वर्ग करण्यात येईल.

32) निविदा धारकाकडून वाहतूक परवाना (टूरिस्ट परमिट) व पिवळ्या रंगाची नंबर प्लेट असलेली वाहने कार्यालयास पाठविण्यात यावीत. नॉन परमिटचे वाहन आल्यास त्याचा वापर नाकारला जाईल व नियमाप्रमाणे दंड लावण्यात येईल. वाहन चालक उपलब्ध नसल्यास/वाहनात पेट्रोल, डिझेल नसल्यास व त्यामुळे वाहन बंद स्थितीत असल्यास, इतर कोणत्याही कारणाने वाहन उपलब्ध नसल्यास रु.1000/- प्रतिदिन प्रमाणे दंड आकारणेत येईल. 8 दिवसापेक्षा जास्त दिवस वाहन उपलब्ध न झाल्यास वरील रु.1000/- प्रतिदिन या दंडाव्यतिरिक्त मागणी केलेली रक्कम ही मासिक देय रक्कमेच्या प्रमाणबध्द (prorate) प्रमाणे देय होईल.

33) पुरविण्यात येणारी वाहने ही निविदाधारक/कंपनीच्या स्वतःच्या मालकीची किमान 5 (पाच) वाहने असणे आवश्यक आहे.

34) निविदाधारकाने कार्यालयाकडे वाहन देताना किंवा कमी करताना या कार्यालयाच्या आस्थापना विभागाची परवानगी घ्यावी. वाहन कमी/जास्त करणेचा अधिकार मा.नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी राखून ठेवला आहे.

35) वाहनाचा विमा व वाहनकर भरला असल्याबाबत कागदपत्राची साक्षांकित प्रत.

36) वाहनाची नोंदणी पुस्तिकेची साक्षांकित प्रत.

37) करार झाल्यानंतर योग्य पद्धतीने वाहन पुरविण्याची जबाबदारी निविदाधारकाची आहे. वारंवार वाहन नादुरुस्त होत असेल तर कार्यालयाचा खोळंबा होऊ शकतो. त्यामुळे वाहन सुस्थितीत ठेवण्यासाठी महिन्यातून फक्त तीन वेळा नादुरुस्त वाहन दुरुस्तीसाठी परवानगी दिली जाईल. तीन वेळेपेक्षा अधिक वेळा सदर वाहन नादुरुस्त झाल्यास ते वाहन रद्द करण्यात येईल व त्या वाहनाऐवजी सुस्थितीतील पर्यायी वाहन पुरविणेची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

38) वाहन चालकाची वर्तणूक ही चांगली, चारित्र्यसंपन्न व निर्व्यसनी असली पाहिजे. कोणत्याही वाहन चालकाविरुद्ध या कार्यालयातील अधिकारी /कर्मचारी यांची तक्रार आल्यास योग्य त्या चौकशीअंती सदर वाहनचालक दोषी आढळल्यास दोन दिवसात त्या वाहन चालकाऐवजी नवीन वाहन चालक पुरविण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

39) करार कालावधीत ठेकेदाराने सेवा नियंत्रणासाठी प्रतिनिधी नेमणे बंधनकारक असून त्याला देण्यात आलेल्या लेखी सूचना ग्राह्य धरण्यात येतील यांची मला कल्पना असून त्यानुसार मंडळाच्या कामासाठी ज्या प्रतिनिधींच्या नेमणूक करण्यात येईल त्यांची संपूर्ण माहिती व संपर्कासाठी आवश्यक असणारा कार्यालयाचा पत्ता व दुरध्वनी क्र. स्वतंत्रपणे देण्यात येईल व भाडेतत्वावर पुरवण्यात आलेल्या वाहनाच्या कामकाजावर कार्यालयाच्या सुचनेनुसार नियंत्रण ठेवील हे मला मान्य असून, या प्रतिनिधीस वेगळा मेहनताना देण्याची जबाबदारी आपली राहील त्याची तोशिष या कार्यालयास लागू देणार नाही.

याप्रमाणे करारनामा आम्ही लिहून देणार – घेणार यांचे समक्ष झाला असून त्यातील अटी व शर्ती आमच्यावर बंधनकारक राहतील.

ठिकाण :

दिनांक :

<u>साक्षीदार :-</u>

1. **सही :**
   **नाव :**
   **पत्ता :**

2. **सही :**
   **नाव :**
   **पत्ता :**